## नियोजन विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२ दिनांक ५, एप्रिल २०२१.

### अधिसूचना

**सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८.**

क्रमांक असांस-१३२०/८४६/प्र.क्र.८९/का-१४१७.— केंद्र शासनाच्या सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८ (२००९ ची ७) च्या कलम ३ व ४ द्वारे दिलेल्या अधिकाराचा वापर करुन सांख्यिकी संग्रहण नियम, २०११ च्या नियम ५ व ७ अन्वये, महाराष्ट्र शासन, याद्वारे 'औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२)' मालिकेसाठी संघटीत उत्पादन क्षेत्र, खाणकाम आणि विद्युत क्षेत्रातील आर्थिक पैलूंची आकडेवारी अनुसूची-१ मध्ये केलेल्या तपशीलानुसार गोळा करण्याचे निर्देश देत आहे.

२. महाराष्ट्र शासन अधिसूचनेच्या अनुसूची-२ मधील तपशीलानुसार उल्लेख केलेल्या अधिकाऱ्यांची राज्याच्या भौगोलिक क्षेत्रातील उद्योगासंबंधी सांख्यिकी माहिती गोळा करण्यासाठी सांख्यिकी अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

३. सांख्यिकी अधिकाऱ्यांद्वारे प्राधिकृत केलेल्या व्यक्तींना प्रत्येक माहिती देणाऱ्या व्यक्तींद्वारे दिल्या गेलेल्या माहितीची पडताळणी, त्यासंबंधीच्या लेख्यांची/कागदपत्रांची पाहणी करणे व ते तपासणे तसेच आवश्यकतेनुसार त्या संबंधी स्पष्टीकरण मागणे या कामासाठी सांख्यिकी अधिकाऱ्याच्या कार्यक्षेत्रात नियुक्त केले जाईल. माहिती गोळा करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या प्रत्येक व्यक्तीकडे संबंधित सांख्यिकी अधिकाऱ्याने त्यांना दिलेल्या छायाचित्रासह असलेले ओळखपत्र किंवा प्राधिकारपत्र सोबत असणे आवश्यक आहे.

४. 'औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२)' करीता माहिती दात्याने पुरविलेल्या आकडेवारीची छाननी आणि पडताळणी केल्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्त्याखाली असलेल्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाकडून सदर आकडेवारीचे संस्करण करण्यात येईल.

५. 'औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२)' च्या संदर्भात समाविष्ट असलेल्या सर्व व्यक्ती सांख्यिकी संग्रहण अधिनियम, २००८ व सांख्यिकी संग्रहण नियम, २०११ मधील तरतुदी अन्वये, शासित केल्या जातील. सांख्यिकी अधिनियम, २००८ च्या कलम ४ च्या उप कलम (४) आणि (६) अन्वये सांख्यिकी अधिकाऱ्यांना कोणतेही अधिकार पुनःप्रदान करण्यात आलेले नाहीत.

### अनुसूची १

**१. विषय व प्रयोजन—** वार्षिक उद्योग पाहणी (वाउपा) चे निकाल उपलब्ध होईपर्यंत औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक हा संघटीत क्षेत्रासाठी औद्योगिक वाढीचा अल्पकालीन सूचक म्हणून घेतला जातो. औद्योगिक उत्पादन निर्देशांक हा चालू महिन्यातील उत्पादित वस्तूंचे आणि पायाभूत वर्ष (२०११-१२) मधील सरासरी मासिक उत्पादन लक्षात घेऊन काढला जातो. औद्योगिकीकरण धोरणाचे नियोजन व कार्यान्वयन करण्यासाठी 'औद्योगिक उत्पादन निर्देशांक (पायाभूत वर्ष २०११-१२)' राज्य शासनासाठी आज अनन्य साधारण महत्त्वाचा आहे आणि या निर्देशांकाचा वापर उद्योग, संशोधन आणि शैक्षणिक संस्थासह विविध संस्था मोठ्या प्रमाणात करीत आहेत.

**२. सांख्यिकी संग्रहण करीताचे भौगोलिक क्षेत्र—** सांख्यिकी संग्रहण करीताच्या भौगोलिक क्षेत्रामध्ये अनुसूची-२ नुसार महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांचा समावेश असेल.

**३. सांख्यिकी संकलनाची पध्दती—** प्रत्येक सांख्यिकी अधिकारी त्याच्या कार्यक्षेत्रांतर्गत माहिती देणाऱ्यास सूचना पत्र निर्गमित करेल, ज्यात कोणत्या दिनांकापर्यंत निश्चित केलेला घटक किंवा घटकांची माहिती नमुन्यानुसार कोणी पुरवावयाची आहे या बाबी दर्शविलेल्या असतील. माहितीदात्यास सूचना पत्रात नमूद केल्यानुसार माहिती व आकडेवारी इलेक्ट्रॉनिक माध्यमातून नोंदविणे बंधनकारक असेल.

**४. ज्यांच्याकडून माहिती संकलित केली जाणार अशा माहिती देणाऱ्यांचे स्वरुप—** उत्पादन आणि मूल्य याची माहिती गोळा करण्यासाठी निवडलेल्या घटकाचा (कारखाना किंवा आस्थापना किंवा उद्योग) मालक किंवा ज्याच्या ताब्यात सदर घटक असेल, ज्याला उत्पादन व मूल्यासंबंधी माहिती सांख्यिकी अधिकाऱ्यास उपलब्ध करुन द्यावी लागेल.

**५. माहिती सादर करण्याची तारीख—** माहिती सादर करण्याच्या तारखेचा उल्लेख प्रत्येक माहितीदात्याला प्राप्त झालेल्या सूचनापत्रात नमूद केलेला असेल आणि ती महिन्याच्या १० तारखेपूर्वी असेल.

Scanned by CamScanner

**६. संदर्भ कालावधी—** एप्रिल २०११ ते मार्च २०१२ व एप्रिल २०१९ ते फेब्रुवारी २०२१ आणि मार्च २०२१ पासून पुढील दर महिन्यांकरीता पुढील महिन्याच्या १० तारखेपूर्वी माहिती देणे आवश्यक आहे.

**७. माहितीचे स्वरुप—** निवडलेल्या वस्तूचे/वस्तूंचे एकूण मासिक उत्पादन आणि मूल्य याबाबत माहिती सांख्यिकी अधिकाऱ्याकडून प्राप्त सूचनापत्रात नमूद केल्यानुसार पुढील महिन्याच्या १० तारखेपर्यंत देण्यात यावी. वस्तूच्या तपशीलासह घटकाचा संपूर्ण अद्ययावत संपर्क तपशील मालक किंवा ज्याच्या ताब्यात सदर घटक (कारखाना किंवा आस्थापना किंवा उद्योग) असेल त्याने नोंदवावा (अधिकृत ई-मेल, मोबाईल, दूरध्वनी क्रमांक आणि संपूर्ण पोस्टल तपशील)

**८. भाषा—** माहिती दाता इंग्रजीमध्ये व मराठीमध्ये माहिती सादर करेल.

**९. व्यवसायासंबंधी कागदपत्रे व निरिक्षण होऊ शकतील अशा लेख्यांचे स्वरुप—** सांख्यिकी अधिकारी किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या व्यक्ती उत्पादन व मूल्य यांच्या आकडेवारीची तपासणी उत्पादन घटकाने जतन केलेल्या मूळ दस्तऐवजामधून करतील.

**१०. माहिती दात्याची जबाबदारी—** माहितीदात्यास प्राप्त झालेल्या सूचना पत्रात नमुद केल्यानुसार व विहित दिनांकापर्यंत माहिती सादर करावी लागेल. तसेच माहिती दात्यास सांख्यिकी अधिकारी किंवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या व्यक्तिस मागितलेल्या माहिती संदर्भात विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील.

## अनुसूची २

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | जिल्हा | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | श्रीमती एम. एन. देवराज उप संचालक | मुंबई शहर आणि मुंबई उपनगर | विकास सेंटर, ९६ अ, सी. जी. रोड, वडवली, वसंतविहार कॉम्प्लेक्स, चेंबुर, मुंबई-४०० ०७४ |
| २ | श्रीमती व्ही. बी. सोने महाव्यवस्थापक | ठाणे | जिल्हा औद्योगिक केंद्र, ठाणे एम.आय.डी.सी. कमर्शियल कॉम्प्लेक्स, २ रा मजला, मोडेला वुलन मिल जवळ, वागळे इंडस्ट्रीयल इस्टेट, जिल्हा ठाणे-४०० ६०४ |
| ३ | श्री. एस. पी. पाटील महाव्यवस्थापक | रायगड | जिल्हा औद्योगिक केंद्र, रायगड, रायगड बाजाराजवळ ता. आलिबाग, जिल्हा रायगड-४०२ २०१ |
| ४ | श्री. एस. पी. कोलते महाव्यवस्थापक | रत्नागिरी | जिल्हा औद्योगिक केंद्र, रत्नागिरी जेल रोड, बी.डी.ओ. ऑफिसर रेसिडेंशिअल वसाहती जवळ, जिल्हा रत्नागिरी-४१५ ६१२. |
| ५ | श्री. एस. पी. कोलते महाव्यवस्थापक | सिंधुदुर्ग | जिल्हा औद्योगिक केंद्र, सिंधूदुर्ग सी. ब्लॉक, २ रा मजला, मुख्य प्रशासकीय इमारत, ओरस (बुद्रुक), ता. कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग-४१६ ५२०. |
| ६ | श्रीमती व्ही. बी. सोने महाव्यवस्थापक | पालघर | जिल्हा औद्योगिक केंद्र, पालघर आर्यन हायस्कुलच्या पाठीमागे, सुर्या प्रोजेक्ट जवळ, पालघर, (पश्चिम)–४०१ ४०४ |
| ७ | श्री. पी. डी. रेंडलकर महाव्यवस्थापक | पुणे | जिल्हा औद्योगिक केंद्र, पुणे, कृषी महाविद्यालय कंपाऊंड, शिवाजी नगर, पुण-४११ ००५. |
| ८ | श्री. एस. बी. रोकडे महाव्यवस्थापक | सातारा | जिल्हा औद्योगिक केंद्र, सातारा, प्लॉट क्र. अ-१३, एम.आय.डी.सी. जिल्हा सातारा-४३१ ००४. |
| ९ | श्री. एन. बी. कोळेकर महाव्यवस्थापक | सांगली | जिल्हा औद्योगिक केंद्र, सांगली, सिटी सर्व्हे क्र. ३००/२, उद्योग भवन, विश्राम बाग, जिल्हा सांगली-४१६ २४६. |

Scanned by CamScanner

अनुसूची २-चालू

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | जिल्हा | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १० | श्री. एन. बी. कोळेकर (प्रभारी) महाव्यवस्थापक | सोलापूर | जिल्हा औद्योगिक केंद्र, सोलापूर, होटगी रोड, किनारा हॉटेल जवळ, जिल्हा सोलापूर-४१३ ००३. |
| ११ | श्री. एस. डी. शेळके महाव्यवस्थापक | कोल्हापूर | जिल्हा औद्योगिक केंद्र, कोल्हापूर, २५४/बी, असेंब्ली रोड, उद्योग भवन, १ ला मजला, जिल्हा कोल्हापूर-४१६ ००८. |
| १२ | श्री. जी. ओ. भारती महाव्यवस्थापक | नागपूर | जिल्हा औद्योगिक केंद्र, नागपूर, उद्योग भवन, २ रा मजला, सिव्हील लाईन्स, जिल्हा नागपूर-४४० ००१. |
| १३ | श्री. एस. एस. मुद्दमवार महाव्यवस्थापक | वर्धा | जिल्हा औद्योगिक केंद्र, वर्धा जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, सेवाग्राम रोड, जिल्हा वर्धा ४२२ ००१. |
| १४ | श्री. एच. के. बदार महाव्यवस्थापक | भंडारा | जिल्हा औद्योगिक केंद्र, भंडारा, राष्ट्रीय महामार्ग रोड, प्रशासकीय इमारत, आर.टी.ओ ऑफिस जवळ, जिल्हा भंडारा ४४१ ९०४. |
| १५ | श्री. एच. के. बदार महाव्यवस्थापक | गोंदिया | जिल्हा औद्योगिक केंद्र, गोंदिया मालधक्का रोड, रेल्वे वॉटर टँक जवळ, ८८८ बिडी कंपनी समोर, रेल्वे स्टेशन जवळ, जिल्हा गोंदिया ४४१ ६१४. |
| १६ | श्री. स्वप्निल राठोड महाव्यवस्थापक | चंद्रपूर | जिल्हा औद्योगिक केंद्र, चंद्रपूर एस.टी. स्टँड जवळ, जिल्हा चंद्रपूर ४४२ ४०१. |
| १७ | श्री. स्वप्निल राठोड महाव्यवस्थापक | गडचिरोली | जिल्हा औद्योगिक केंद्र, गडचिरोली, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, जिल्हा गडचिरोली ४२२ ६०६. |
| १८ | श्री. यू. एस. पुरी महाव्यवस्थापक | अमरावती | जिल्हा औद्योगिक केंद्र, अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मागे, अमरावती कॅम्प, जिल्हा अमरावती ४४४ ६०२. |
| १९ | श्री. निलेश निकम महाव्यवस्थापक | अकोला | जिल्हा औद्योगिक केंद्र, अकोला, जुना कापूस (सुती) बाजार, जिल्हा अकोला ४४४ ००१ |
| २० | श्री. चेतन पाटील महाव्यवस्थापक | बुलढाणा | जिल्हा औद्योगिक केंद्र, बुलढाणा, जातकर भवन, टिळकवाडी, बस स्टँड रोड, जिल्हा बुलढाणा ४४३ ००१. |
| २१ | श्री. चेतन पाटील महाव्यवस्थापक | वाशिम | जिल्हा औद्योगिक केंद्र, वाशिम जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ, जिल्हा वाशिम ४४४ १०५. |
| २२ | श्री. निलेश निकम महाव्यवस्थापक | यवतमाळ | जिल्हा औद्योगिक केंद्र, यवतमाळ, उद्योग भवन, तिसरा मजला, दारव्हा रोड, जवाहरलाल दर्डा नगर जवळ, जिल्हा यवतमाळ ४४५ ००१ |
| २३ | श्री. एस. एस. गवळी (प्रभारी) महाव्यवस्थापक | नाशिक | जिल्हा औद्योगिक केंद्र, नाशिक, औद्योगिक प्रशिक्षण केंद्राजवळ, एम.आय.डी.सी. बसाहत, सातपूर, जिल्हा नाशिक ४२२ ००७ |



Scanned by CamScanner

**अनुसूची २-समाप्त**

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव व पदनाम | जिल्हा | कार्यालयाचा पत्ता |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| २४ | श्री. यु. एस. दंडगव्हाळ<br>महाव्यवस्थापक | जळगाव | जिल्हा औद्योगिक केंद्र, जळगाव., शासकीय तंत्रज्ञान महाविद्यालयाजवळ, राष्ट्रीय महामार्ग क्र. ९, जिल्हा जळगाव ४२५ ००१. |
| २५ | श्री. एस. एस. गवळी<br>महाव्यवस्थापक | अहमदनगर | जिल्हा औद्योगिक केंद्र, अहमदनगर, अहमदनगर महाविद्यालयाजवळ, एम.एस.इ.बी. कार्यालयाच्यासमोर, जिल्हा अहमदनगर ४१४ ००५. |
| २६ | श्री. ए. यू. इंगळे<br>महाव्यवस्थापक | धुळे | जिल्हा औद्योगिक केंद्र, धुळे, जामनगरी रोड, तुषार रुग्णालयाच्या समोर, जिल्हा धुळे ४२४ ००१ |
| २७ | श्री. यु. के. सांगळे<br>महाव्यवस्थापक | नंदुरबार | जिल्हा औद्योगिक केंद्र, नंदुरबार, टोकर तलाव रोड, प्रशासकीय इमारत, कक्ष क्रमांक २८, जिल्हा नंदुरबार ४२५ ४१२. |
| २८ | श्री. डी. के. शिवदास<br>(प्रभारी) महाव्यवस्थापक | औरंगाबाद | जिल्हा औद्योगिक केंद्र, औरंगाबाद, एम.टी.डी.सी. च्या समोर, स्टेशन रोड, जिल्हा औरंगाबाद ४३१ ००१ |
| २९ | श्रीमती करुणा खरात<br>महाव्यवस्थापक | जालना | जिल्हा औद्योगिक केंद्र, जालना, प्लॉट क्रमांक पी-७, एम.आय.डी.सी., जिल्हा जालना ४३१ २०३. |
| ३० | श्री. डी. के. शिवदास<br>(प्रभारी) महाव्यवस्थापक | बीड | जिल्हा औद्योगिक केंद्र, बीड, बशीरगंज, जिल्हा बीड ४३१ १२२. |
| ३१ | श्री. पी. डी. हानबर<br>(प्रभारी) महाव्यवस्थापक | उस्मानाबाद | जिल्हा औद्योगिक केंद्र, उस्मानाबाद, प्रशासकीय इमारत समोर, जिल्हा कारागृहाजवळ, जिल्हा उस्मानाबाद ४३१ ५०१. |
| ३२ | श्री. पी. डी. हानबर<br>(प्रभारी) महाव्यवस्थापक | लातूर | जिल्हा औद्योगिक केंद्र, लातूर, प्लॉट क्र. पी -५, एम.आय.डी.सी., जिल्हा लातूर ४१३ ५३७. |
| ३३ | श्री. किरण जाधव<br>महाव्यवस्थापक | नांदेड | जिल्हा औद्योगिक केंद्र, नांदेड, उद्योग भवन, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, जिल्हा नांदेड ४३१ ६०२. |
| ३४ | श्री. किरण जाधव<br>(प्रभारी) महाव्यवस्थापक | परभणी | जिल्हा औद्योगिक केंद्र, परभणी, कोरेगाव जकात नाका जवळ, जिल्हा परभणी ४३१ ००१. |
| ३५ | श्री. किरण जाधव<br>(प्रभारी) महाव्यवस्थापक | हिंगोली | जिल्हा औद्योगिक केंद्र, हिंगोली, केंद्रीय प्रशासकीय इमारत, २ रा मजला, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा हिंगोली ४३१ ७०१. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**देबाशिष चक्रबर्ती,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

Scanned by CamScanner

## PLANNING DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 5th April 2021

*NOTIFICATION*

COLLECTION OF STATISTICS ACT, 2008.

No. DES-1320/846/C.R. 89/Desk-1417.— In exercise of the powers conferred by sections 3 and 4 of the Collection of Statistics Act, 2008 (7 of 2009) read with rules 5 and 7 of the Collection of Statistics Rules, 2011, the Government of Maharashtra hereby directs collection of statistics of economic aspects in Organized Manufacturing Sector, Mining Sector and Electricity Sector for the series of 'Index of Industrial Production (Base year 2011-12)' as per the details mentioned in Schedule-I.

2. The Government of Maharashtra hereby appoints the officers as per the details mentioned in Schedule-II, as Statistics Officers in respect of the geographical units mentioned therein for the purpose of collection of statistics.

3. The officers who may be authorized by Statistics Officer shall in the jurisdiction of the statistics officer engage in verification of information furnished by each informant, for inspecting relevant records, and for seeking clarifications, as may be necessary. Each Officer authorised for Collection of Statistics shall carry a photo identity card or a letter of authorization issued by the concerned Statistics Officer.

4. The statistics collected in respect of 'Index of Industrial Production (Base year 2011-12)' furnished by the informants, after due verification and scrutiny, shall be processed by the Directorate of Economics and Statistics, under the Planning Department of the Government of Maharashtra.

5. The persons engaged in any activity in respect of 'Index of Industrial Production (Base year 2011-12)' shall be governed by the provisions under the Collection of Statistics Act, 2008 and the Collection of Statistics Rules, 2011 framed thereunder. No power has been delegated to any Statistics Officer under sub-section *(4)* and *(6)* of Section 4 of The Collection of Statistics Act, 2008.

*Schedule - I*

1. *Subject and Purpose*.— Index of Industrial Production (Base year 2011-12) is a short-term indicator of industrial growth for the organized sector till the results from the Annual Survey of Industries (ASI) becomes available to the State Government. The Index of Industrial Production (Base year 2011-12) is compiled by taking into account the quantities of items produced during the current month, *vis-à-vis* the average monthly production (Base year 2011-12). The Index of Industrial Production (Base year 2011-12) is of paramount importance to the State Government for planning and implementing industrialization policies and is also being extensively used by various organizations, including Industry, Research, and Academic Institutions.

2. *Geographical area for collection of statistics.*— Geographical area for collection of statistics shall be all the districts of Maharashtra as per the details mentioned in schedule-II.

3. *Method of Data Collection.*— Notice shall be issued by each Statistics Officer to informants under his jurisdiction, indicating therein by whom and by which date the identified unit or units shall provide information in the formats to the Statistics Officer. It is compulsory for informants to furnish the prescribed information in Electronic Form as may be specified in the Notice.

4. *Nature of Informants.*— The owner or occupier of a unit (*i.e.*, a factory or establishment or enterprise) selected for Collection of Production and Value data shall furnish information about their products to the statistics officer.

5. Date of Submission.— The date for submission of information by each informant shall be mentioned in the notice of Statistics Officer and it would be before 10th of every month.



Scanned by CamScanner

6. *Reference Period.*—The Information on Production and Value data is required to be furnished month wise from April 2011 to March 2012 and from April 2019 to February 2021 and thereafter March 2021 onwards before the 10th of next month.

7. *Nature of information.*— Total quantity of Production and Value data in a month of production for the item(s) under consideration, mentioned in the Notice, by the Statistics Officer shall be provided for by 10th of next month. The item details shall be recorded along with complete updated contact details of the units (official e-mail, mobile, landline number and complete postal details) by the owner or occupier of the unit (*i.e.*, a factory or establishment or enterprise)

8. *Language.*— Informant shall furnish the information in English and in Marathi.

9. *Inspection of Business Records and Other Records.*— Original Records maintained by Manufacturing Units for Production and Value data may be inspected by the Statistics Officer or person authorized by him.

10. *Obligation of Informant.*— The informant shall furnish information in the manner and by the date mentioned in the notice received by him. The informant should also answer the questions in relation to the information sought, as may be required by the Statistics Officer or a person authorized by the Statistics Officer.

*Schedule-II*

| Sr. No. | Name and Designation of the Officer | District | Office Address |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 1 | Smt. M. N. Devraj Deputy Director | Mumbai City and Mumbai Suburban | Vikas Centre, 96A, C.G. Road, Wadavli, Vasant Vihar Complex, Chembur, Mumbai 400 074. |
| 2 | Smt. V. B. Sone General Manager | Thane | District Industries Centre, Thane, M.I.D.C. Commercial Complex, 2nd Floor, Near Modela Woollen Mill, Wagle Industrial Estate, District Thane 400 604. |
| 3 | Shri S. P. Patil General Manager | Raigad | District Industries Centre, Raigad Near Raigad Bazar, Taluka Alibag, District Raigad 402 201 |
| 4 | Shri S. P. Kolte General Manager | Ratnagiri | District Industries Centre, Ratnagiri., Jail Road, Near BDO Officers Residential Vasahad, District Ratnagiri 415 612. |
| 5 | Shri S. P. Kolte General Manager | Sindhudurg | District Industries Centre, Sindhudurg C Block, 2nd Floor, Main Administrative Bldg., Oros (Budruk), Taluka Kudal, District Sindhudurg 416 520. |
| 6 | Smt. V. B. Sone General Manager | Palghar | District Industries Centre, Palghar, Behind Aryan High School, Near Surya Project, Palghar West 401 404 |
| 7 | Shri P. D. Rendalkar General Manager | Pune | District Industries Centre, Pune, Agriculture College Compound, Shivaji Nagar, Pune 411 005. |
| 8 | Shri S. B. Rokade General Manager | Satara | District Industries Centre, Satara, Plot No. A-13, M.I.D.C. Office, District Satara 431 004. |
| 9 | Shri N. B. Kolekar General Manager | Sangli | District Industries Centre, Sangli, City Survey No. 300/2, Udyog Bhavan, Vishram Bag, District Sangli 416 246. |

Scanned by CamScanner

| Sr. No. | Name and Designation of the Officer | District | Office Address |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 10 | Shri N.B. Kolekar (Addl.) General Manager | Solapur | District Industries Centre, Solapur Hotagi Road, Near Kinara Hotel, District Solapur 413 003. |
| 11 | Shri S. D. Shelke General Manager | Kolhapur | District Industries Centre, Kolhapur, 254/B, Assembly Road, Udyog Bhavan, 1st Floor, District Kolhapur 416 008. |
| 12 | Shri. G. O. Bharti General Manager | Nagpur | District Industries Centre, Nagpur, 2nd Floor, Udyog Bhavan, Civil Lines, District Nagpur 440 001. |
| 13 | Shri. S. S. Muddamwar General Manager | Wardha | District Industries Centre, Wardha. Near Collector Office, Sevagrame Road, District Wardha 422 001. |
| 14 | Shri. H. K. Badar General Manager | Bhandara | District Industries Centre, Bhandara, National High-way Road, Administrative Building, Near RTO Office, Dist. Bhandara 441 904. |
| 15 | Shri. H. K. Badar General Manager | Gondia | District Industries Centre, Gondia, Maldhakka Road, Near Railway Water Tank, 888 Opp. Bidi Company, Near Railway Station, District Gondiya 441 614. |
| 16 | Shri. Swapnil Rathod General Manager | Chandrapur | District Industries Centre, Chandrapur, Near S.T. Stand, District Chandrapur 442 401. |
| 17 | Shri. Swapnil Rathod General Manager | Gadchiroli | District Industries Centre, Gadchiroli, Collector Office Compound, District Gadchiroli 422 606. |
| 18 | Shri U. S. Puri General Manager | Amravati | District Industries Centre, Amravati., Behind Collector Office, Amravati Camp, District Amravati 444 602. |
| 19 | Shri Nilesh Nikam General Manager | Akola | District Industries Centre, Akola, Old Kapus (Suti) Bazar, District Akola 444 001. |
| 20 | Shri Chetan Patil General Manager | Buldhana | District Industries Centre, Buldhana Jatkar Bhavan, Tilakwadi, Bus Stand Road, District Buldhana 443 001. |
| 21 | Shri Chetan Patil General Manager | Washim | District Industries Centre, Washim, Near Collector Office, District Washim 444 105. |
| 22 | Shri Nilesh Nikam General Manager | Yavatmal | District Industries Centre, Yavatmal, Udyog Bhavan, 3rd Floor, Darvha Road, Near Jawaharlal Darda Nagar, District Yavatmal 445 001. |
| 23 | Shri S. S. Gawali (Addl.) General Manager | Nashik | District Industries Centre, Nashik., Near Industrial Training Centre, M.I.D.C. Vasahat, Satpur, District Nashik 422 007. |

Scanned by CamScanner

| Sr. No. | Name and Designation of the Officer | District | Office Address |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) |
| 24 | Shri. U. S. Dandgavhal<br>General Manager | Jalgaon | District Industries Centre, Jalgaon, Near Govt.Technical College, National Highway No.9, District Jalgaon 425 001. |
| 25 | Shri S.S. Gawali<br>General Manager | Ahmednagar | District Industries Centre, Ahmednagar Near Ahmednagar College, Opposite M.S.E.B. Office,<br>District Ahmednagar 414 005. |
| 26 | Shri. A. U. Ingle<br>General Manager | Dhule | District Industries Centre, Dhule, Jamnagari Road, Opposite Tushar Hospital, District Dhule 424 001 |
| 27 | Shri U. K. Sangle<br>General Manager | Nandurbar | District Industries Centre, Nandurbar, Tokar Talao Road, Administrative Building, Room No. 28,<br>District Nandurbar 425 412. |
| 28 | Shri D. K. Shivdas<br>(Addl.) General Manager | Aurangabad | District Industries Centre, Aurangabad, Opp. M.T.D.C., Station Road,<br>District Aurangabad 431 001. |
| 29 | Smt. Karuna Kharat<br>General Manager | Jalna | District Industries Centre, Jalana, Plot No. P-7, M.I.D.C. District Jalana 431 203. |
| 30 | Shri D. K. Shivdas<br>(Addl.) General Manager | Beed | District Industries Centre, Beed, Bashirganj, District Beed 431 122. |
| 31 | Shri P. D. Hanbar<br>(Addl.) General Manager | Osmanabad | District Industries Centre, Osmanabad, Opp. Administrative Building, Near District Jail, District Osmanabad 431 501. |
| 32 | Shri P.D. Hanbar<br>(Addl.) General Manager | Latur | District Industries Centre, Latur, Plot No.P-5, M.I.D.C.,<br>District Latur 413 537. |
| 33 | Shri Kiran Jadhav<br>General Manager | Nanded | District Industries Centre, Nanded, Udyog Bhavan, Co-operative Industrial Estate, Shivajinagar,<br>District Nanded 431 602. |
| 34 | Shri Kiran Jadhav<br>(Addl.) General Manager | Parbhani | District Industries Centre, Parbhani, NearKoregaon Octroi Naka,<br>District Parbhani 431 001. |
| 35 | Shri Kiran Jadhav<br>(Addl.) General Manager | Hingoli | District Industries Centre, Hingoli, Central Administrative Building, 2nd Floor, Collector Office,<br>District Hingoli 431 701. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DEBASHISH CHAKRABARTY

Additional Chief Secretary to Government.

Scanned by CamScanner

**Government of Maharashtra**

**Directorate of Economics and Statistics, Planning Department**

# Index of Industrial Production

**Schedule for Collection of Quarterly Production Figures**

**Year : 2011-12/2016-17/2017-18/2018-19/……**

| **Block 1: Identification particulars** | |
|---|---|
| 1. Factory DSL No. | As mentioned in letter |
| 2. District Name | |
| 3. Name of the factory | |
| 4. Address of the factory | |
| 5. CIN No. | |
| 6. Details of Contact Person: | |
| Name | |
| Designation | |
| Tel. (with STD code) | |
| Mobile No. | |
| Fax No. | |
| E-mail ID (factory / contact person) | |
| | |

Scanned by CamScanner

**Block 2: Production details**

**a) Item Description:** **b) NPCMS Code:** **c) Unit: Tonne**

| Sr. No. | Month | 2011-12 | | 2016-17 | | 2017-18 | | 2018-19 | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Production | | Production | | Production | | Production | |
| | | Quantity | Value (in Rs.) | Quantity | Value (in Rs.) | Quantity | Value (in Rs.) | Quantity | Value (in Rs.) |
| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) |
| 1 | April | | | | | | | | |
| 2 | May | | | | | | | | |
| 3 | June | | | | | | | | |
| 4 | July | | | | | | | | |
| 5 | August | | | | | | | | |
| 6 | Sep. | | | | | | | | |
| 7 | Oct. | | | | | | | | |
| 8 | Nov. | | | | | | | | |
| 9 | Dec. | | | | | | | | |
| 10 | January | | | | | | | | |
| 11 | February | | | | | | | | |
| 12 | March | | | | | | | | |

**Block 3: Enumerator Details**

| Name of the enumerator | Signature of the enumerator | Date |
|---|---|---|
| | | |

| **Block 4: Remarks, if any, for wide variation in quantity of production** |
|---|
| |

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.

Scanned by CamScanner